जट्रोफा लागवडीत महाराष्ट्राची घाई!

जट्रोफा हे पीक भविष्यकाळात अतिशय महत्त्वाचे असले, तरी त्याबाबत येणारी नवनवी माहिती, धोरणे आदींची माहिती शेतकऱ्यांना देणे ही 'अॅग्रोवन'ची भूमिका आहे. एप्रिल २००६मध्ये महाराष्ट्र सरकारने जट्रोफा लागवडीचा रोजगार हमी योजनेतील फळबाग कार्यक्रमात समावेश केला. या योजनेचा फायदा राज्यातील लहान शेतकऱ्यांना होणे अपेक्षित आहे. हा निर्णय खरोखरीच लहान शेतकऱ्यांच्या हिताचा आहे का हे तपासण्यासाठी 'प्रयास' संस्थेच्या 'संसाधने आणि उपजीविका' गटाने एक अभ्यास हाती घेतला. या अभ्यासातून ठळकपणे पुढे आलेले मुद्दे या लेखात मांडत आहोत...

एप्रिल २००६मध्ये महाराष्ट्र सरकारने जट्रोफाचा रोजगार हमी योजना (रोहयो), फळबाग कार्यक्रमात समावेश करून एक मोठा धोरणात्मक निर्णय घेतला. या योजनेद्वारे २००६-०७ या एका वर्षात जट्रोफाच्या एक कोटी, अकरा लाख आणि दहा हजार झाडांची 'प्रायोगिक तत्त्वावर' लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. प्रत्येक झाडामागे तीन वर्षांत एकूण १८.४० रु. अनुदान दिले जाणार आहे. या प्रयोगासाठी 'रोहयो' निधीतून (जनतेच्या) २० कोटींपेक्षा जास्त खर्च होणार आहे. लागवड जरी प्रायोगिक तत्त्वावर असली तरी, सरकार उत्पन्नाची किंवा बियांच्या रोपवाटिकांची संख्याही वाढत चालली आहे. शेतकऱ्यांवर सर्व माध्यमांतून माहितीचा भडिमार होत आहे. शासनाकडून लागवडीसाठी वेगवेगळ्या सवलत योजना जाहीर होत आहेत, तर खासगी कंपन्या जट्रोफा लागवडीसाठी शेतकऱ्यांना कर्ज उभारून देत आहेत. जट्रोफा आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरण्याकरिता तीन बाबी सर्वांत महत्त्वाच्या आहेत, त्या म्हणजे - जट्रोफापासून मिळू शकणारे तेलबियांचे उत्पादन, त्यातील तेलांश आणि त्या तेलबियांना बाजारात मिळणारा भाव.

उत्पादन :

महाराष्ट्रात जट्रोफा लागवडीचा सर्वांत मोठा प्रयोग (२० हजार एकर) विनायकदादा पाटील यांनी १९८६-१९९१दरम्यान नाशिक जिल्ह्यात केला. त्या सुमारास झालेल्या लागवडीतून जट्रोफाच्या प्रत्येक झाडापासून एक ते दीड किलो तेलबिया मिळाल्याचा अनुभव आला. उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भात महेश शेलार आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केलेल्या एका पाहणीनुसार, केवळ पावसाच्या पाण्यावर जोपासलेल्या जट्रोफापासून तिसऱ्या वर्षात सरासरी एक किलो उत्पादन मिळाल्याचे दिसून आले. आतापर्यंतचा एकूण अनुभव पाहता, सध्या उपलब्ध असलेल्या जट्रोफा बियाण्यापासून दर झाडामागे एक किलोपेक्षा जास्त उत्पादन मिळण्याची खात्री नाही.

तेलांश :

जट्रोफाच्या बियांमध्ये तेलाचे प्रमाण पाहण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाने देशभरात २००४-०५मध्ये एक पाहणी केली, त्यानुसार महाराष्ट्रात जट्रोफाच्या तेलबियांमध्ये किमान २१ टक्के ते कमाल ४२ टक्के एवढा फरक आढळला. कोणत्याही तेलबियांना मिळणारा बाजारभाव हा त्यातील तेलाच्या टक्केवारीवर अवलंबून असतो. सरकारी आकडेवारीत ३० ते ३५ टक्के तेल देणाऱ्या बियांना पाच रुपये किलो असा भाव गृहीत धरला आहे, परंतु जट्रोफाच्या तेलबियांना कोणत्याही बाजारभावाची हमी अद्याप शासनाने दिलेली नाही.

उत्पन्न :

सध्याच्या परिस्थितीत पडीक जमिनीत जट्रोफाची लागवड केली, तर शेतकऱ्याला एक हेक्टरमधून साधारण किती उत्पन्न मिळेल? पडीक जमिनीत जट्रोफाची जास्तीत जास्त १६६० झाडे लावता येतात. जट्रोफापासून स्थिर उत्पादन मिळायला सहा ते सात वर्षे जावी लागतात. सहा वर्षांनंतर, झाडामागे एक किलो या प्रमाणे, हेक्टरी १६६०*किलो तेलबिया मिळतील. ५ रु. किलो असा भाव धरला तर ८३०० रु. एक हेक्टर पडीक जमिनीतून मिळतील. मजुरी आणि देखभालीचा खर्च वजा जाता सहाव्या वर्षांपासून हेक्टरी ५३०० रु. हाती पडतील.

नफा :

जट्रोफाच्या एका रोपाची किमत आज दोन ते वीस रुपये अशी आहे. दुर्दैवाने, अनेक खासगी रोपवाटिकांकडील रोपे किंवा बियाण्यातील तेलाची टक्केवारी आणि गुणवत्तेची खात्रीशीर माहिती सरकारकडे नाही. (विविध खासगी रोपविक्रेत्यांनी केलेल्या दाव्यांचे विश्लेषण या अभ्यासाद्वारे 'प्रयास'ने केलेले नाही.) रोपाची किंमत चार आणि सहा रुपये लागवडखर्च धरला, तर १६६० रोपांची लागवड करण्यासाठी १६ हजार ६६० रुपये खर्च होईल. दर वर्षी होणारी मजुरी आणि देखभालीचा खर्च वसूल होऊन नफ्यात येण्यासाठी (५ रुपये प्रति किलो या बाजारभावाने) किमान आठ वर्षांचा काळ लागेल.

संशोधन आणि सरकारी धोरणातील विसंगती :

नोव्हेंबर २००४पासून केंद्र सरकारने जट्रोफाच्या सुधारित जाती आणि लागवड व देखभालीसाठी मार्गदर्शक तत्त्वे यांच्या संशोधनाकरिता एक राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेतला आहे. राज्यातील दोन कृषी विद्यापीठांचा (पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी) यांचा या कार्यक्रमात सहभाग आहे. २००७पर्यंत या संशोधनातून सुधारित जाती विकसित होतील असा अंदाज आहे. पुढील ३-४ वर्षांमध्ये सर्व आवश्यक चाचण्या पूर्ण होऊन शेतकऱ्यांना या सुधारित जाती लागवडीकरिता मिळू शकतील. याच कार्यक्रमाचा एक भाग असलेल्या 'आदर्श लागवड योजने'तून महाराष्ट्रात ११३० हेक्टर क्षेत्रावर किमान ३० टक्के तेलांश आणि प्रति झाड दोन किलो उत्पादनक्षमता असणाऱ्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. हे निवडक बियाणे २००७पासून शेतकऱ्यांना मिळू शकेल.

जट्रोफापासून ३० ते ४० वर्षे उत्पादन मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे तांदूळ, गहू यांसारख्या हंगामी पिकांप्रमाणे, दर वर्षी जट्रोफाच्या वेगळ्या/सुधारित जाती लावता येणे शक्य होणार नाही. रोपांच्या गुणवत्तेची खात्री नाही, लागवडीचा अनुभव नाही, तसेच बाजारभावाची शासनाकडून नसलेली हमी, या सगळ्या गोष्टींचा विचार करता जट्रोफासारखे ३०-४० वर्षे उत्पादन देणारे अपारंपरिक पीक लाखभराची घाई करणे अत्यव्यवहार्य ठरेल. आज लागवड केल्यास भविष्यातील सुधारित जातींपासून मिळणाऱ्या फायद्यांना शेतकऱ्यांना मुकावे लागेल. या सर्व गोष्टींचा विचार न करताच, कोणतीही दूरदृष्टी न दाखवता महाराष्ट्र सरकारने फळबाग योजनेत जट्रोफाचा घाईने समावेश केला आहे.

शेतकऱ्यांनी केलेल्या 'प्रयोगाची' जबाबदारी घेण्याचीदेखील तयारी शासनाने दाखवलेली नाही. रोहयो आणि फळबाग योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना रोजगार आणि उपजीविकेचे सुरक्षित साधन उभे करून देणे हा आहे. परंतु कोणतीही तयारी नसताना, मूळ उद्देशाशी पूर्णपणे विसंगत असे 'कृषी प्रयोग' शासन शेतकऱ्यांच्या जिवावर करीत आहे. शासनाने हा निर्णय तातडीने मागे घेऊन संशोधन आणि प्रयोग करण्याचे काम राज्यातल्या कृषी विद्यापीठांना करू द्यावे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन हितासाठी काही पावले उचलणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने उत्तम प्रतीचे आणि सुधारित बियाणे (किमान दोन किलो प्रति झाड उत्पादनक्षमता किंवा अधिक तेलांश असणाऱ्या जाती), लागवड आणि योग्य देखभालीकरिता (पाणी, खत, कीडनियंत्रण इत्यादी) मार्गदर्शक तत्त्वे, तसेच किमान खरेदी भावाची हमी यांचा समावेश असणे आवश्यक आहे, तसेच शेतकऱ्यांची भूमिका 'केवळ कच्च्या मालाचा (तेलबिया) पुरवठादार' अशी न राहता त्यांना जट्रोफापासून रोजगाराच्या इतर संधी मिळण्यात यासाठी शासनाने 'जट्रोफावर आधारित उपजीविका विकास कार्यक्रम' हाती घ्यावा. या कार्यक्रमाद्वारे गाव/तालुका पातळीवर सुधारित तेल आणि खतनिर्मिती केंद्रे, तेलबिया संकलन आणि साठा केंद्रे स्थापन करण्याकरिता प्रयत्न व्हायेत. त्यातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होऊ शकतील.

सरकारी धोरणातील विसंगती :

- संशोधन अपूर्ण असतानाच २००६-०७मध्ये फळबाग योजनेतून जट्रोफाच्या एक कोटी, अकरा लाख आणि दहा हजार झाडांची 'प्रायोगिक' लागवड करण्याचा शासनाचा निर्णय घाईचा.

– डॉ. चंद्रशेखर जोगळेकर
संसाधने आणि उपजीविका गट,
प्रयास, पुणे. (मो. ९८५०६ ५४१८३)

सद्यःस्थिती

- पडीक जमिनीतून सध्याच्या बियाणांपासून, झाडामागे एक किलोपेक्षा जास्त उत्पादन मिळण्याची खात्री नाही.
- ५ रु. प्रति किलो दराने वसुलीला किमान आठ वर्षे लागणार.
- बाजारभावाची आणि उत्पन्नाची शासनाकडून हमी नाही.
- सुधारित जाती, मार्गदर्शक तत्त्वे यासाठी संशोधन अजून सुरू. येत्या तीन-चार वर्षांत सुधारित बियाणे शेतकऱ्यांना मिळण्याची शक्यता.